**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**सहसंचालक, नगर रचना, कोंकण विभाग, नवी मुंबई यांचे कार्यालय,**
तिसरा मजला, कक्ष क्र. ३०५, कोंकण भवन, नवी मुंबई-४००६१४

दिनांक- १६/०७/२०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६:**

क्र. प्रायो ठा-पा-रा/ मौजे कोलठण आणि मौजे भालुक / ता.मुरबाड/जि.ठाणे/कलम २०(४)/प्र.क्र.१४/२४८१ /सहसंकोवि/

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे), मधील तरतूदीनुसार ठाणे-पालघर-रायगड प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दि.०६.०१.२०१८ रोजी मंजूर केली असून, ती दि.०६.०३.२०१८ पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्या अर्थी उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे कोलठण, ता. मुरबाड, जि. ठाणे आणि मौजे भालूक ता. मुरबाड, जि. ठाणे येथील सोबतच्या अनूसुचित नमूद केलेल्या गट क्रमांकाच्या जमिनी ठाणे-पालघर-रायगड प्रादेशिक योजनेत समाविष्ट असून सदर जमिनी शेती विभाग (Agriculture Zone)/ ना-विकास विभागात (No Development Zone)(भागशः क्षेत्र आरेखनीय चूक दुरुस्त करून) (यापुढे ज्यास "उक्त जमिनी" असे संबोधले आहे) समाविष्ट आहेत;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपध्दती बाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दि.६.५.२०१५ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत, (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे) व त्या अनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोटकलम (३) मधील तरतूदीनुंसार, उक्त जमिनींपैकी २०.२६.१ हे.आर. क्षेत्र , शेती विभाग (Agriculture Zone)/ ना-विकास विभाग (No Development Zone) यामधून वगळून, काही अटींच्या अधीन राहून, 'रहिवास विभागात' समाविष्ट करण्याचे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे (यापुढे ज्यास "उक्त प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे), असे उक्त शासन निर्णयान्वये गठीत "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले आहे.

Scanned with CamScanner

आणि ज्या अर्थी उक्त शासन निर्णयानुसार गठीत "प्रस्ताव छाननी समिती"ने उक्त जमिनीपैकी २०.२६.९ हे.आर. क्षेत्र , शेती विभाग (Agriculture Zone)/ ना-विकास विभाग (No Development Zone) यामधून वगळून, रहिवास विभागात समाविष्ट करणेस काही अटींच्या अधीन राहून, तत्वत: मान्यता दिली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोटकलम (३) मधील तरतूदीनुसार उक्त प्रस्तावीत फेरबदल प्रस्तावाबाबत सहसंचालक, नगर रचना, कोंकण विभाग, नवी मुंबई यांनी क्र. प्रायो ठा-पा-रा/ मौजे कोलटण आणि मौजे भालुक / ता.मुरबाड/जि.ठाणे/कलम २०(३)/प्र.क्र.१४/ सहसंकोवि/२२७७, दि.२१.१२.२०१९ अन्वये आम जनतेच्या सूचना/ हरकतीसाठी महाराष्ट्र शासन राजपत्र,भाग १ कोकण विभागीय पुरवणी, दि. ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२० रोजी पृष्ठ क्र.२६ ते २९ वर नोटिस प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच दि.२५.१२.२०१९ रोजीच्या दै.पुण्यनगरी (मराठी) व दि.२४.१२.२०१९ रोजीच्या दै.मिड डे (इंग्रजी) या वृत्तपत्रात नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रसिध्द सूचनेवर विहीत मुदतीत कोणतीही सूचना/ हरकत प्राप्त झाली नाही आणि उक्त जमिनींपैकी २०.२६.९ हे.आर. क्षेत्र , शेती विभाग (Agriculture Zone)/ ना-विकास विभाग (No Development Zone) यामधून वगळून, रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले आहे ,

आणि ज्याअर्थी, जमिनधारकांनी यासंबंधाने आवश्यक अधिमूल्य व प्रसिध्दी शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ पोटकलम (१) अन्वये निर्णय क्र. टिपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दि. ११.६.२०१५ नुसार कलम २०(२), २०(३) व २०(४) खालील अधिकार संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्रदान केलेले आहेत ;

त्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० पोटकलम (४) चे शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, सहसंचालक नगर रचना, कोंकण विभाग, नवी मुंबई, उक्त प्रस्तावीत फेरबदलास मंजूरी देत आहेत आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजूरीच्या अधिसूचने सोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये, शेवटच्या नोंदीनंतर खालीलप्रमाणे बदलाची नोंद घेण्याचे निदेश देत आहे.

**नोंद**

मौजे कोलठण, ता. मुरबाड, जि. ठाणे आणि मौजे भालूक ता. मुरबाड, जि. ठाणे येथील सोबतच्या अनूसुचित नमूद केलेल्या जमिनींपैकी उक्त अधिनियमाच्या कलम २०(४) अन्वये मंजूर फेरबदलाखालील एकूण क्षेत्र २०.२६.९ हे.आर. क्षेत्र , नकाशात दर्शविल्यानुसार, शेती विभाग (Agriculture Zone)/ ना-विकास विभाग (No Development Zone)) यामधून वगळून खालील अटींसापेक्ष रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

१) शासनाने शासन निर्णय दि.०६.०५.२०१६ व दि. ०४.०१.२०१६ तसेच वेळोवेळी निर्धारीत केलेले अधिमुल्य, शुल्क व शासन निर्णयातील सर्व अटी जमिनधारक / विकासक यांचेवर बंधनकारक

Scanned with CamScanner

(८५) (६१)

राहतील.

२) सदर फेरबदलाखालील जमिनीचे विकसन करतांना, १०% क्षेत्र 'सार्वजनिक सुविधांसाठी' प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

३) सदर फेरबदलाखालील जमिनींचा विकास करताना एक मुख्य रस्ता १५ मी. रुंदीचा ठेवून तो हद्दीपर्यंत ठेवणे आवश्यक आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ या कार्यालयात व सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

सदर अधिसूचना www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(प्रकाश भुक्ते)
**सहसंचालक, नगर रचना,**
**कोंकण विभाग, नवी मुंबई**

Scanned with CamScanner